प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची डुप्लीकेट प्रत देणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- आरपीए-२००४/प्र.क्र.१०१/र-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ४ जून, २००४.

परिपत्रक :---

एखादे प्रकल्पग्रस्तांकडून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मूळ प्रत हरविल्यास / गहाळ झाल्यास सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची दुय्यम प्रत द्यावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

"ज्या व्यक्तीकडून प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची प्रत हरविली / गहाळ झाली त्याबाबत संबंधित व्यक्तीने त्याच दिवशी किंवा लगतच्या दुस-या दिवशी पोलिस स्टेशनला तक्रार नोंदविली असली पाहिजे व तसे जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना कळविलेले असले पाहिजे. त्या व्यक्तींकडून दुय्यम प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची प्रत मिळण्यासंबंधी प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात यावे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांचा वापर यापूर्वी कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने किंवा स्वत: घेतला नसल्याचे नमूद असावे व प्रमाणपत्रातील माहिती खोटी आढळून आल्यास होणारी शिक्षा त्यांना मान्य असेल असाही त्यामध्ये उल्लेख असावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

आ.प्र.रणदिवे

( आशा प्र. रणदिवे )
शासनाचे अवर सचिव,

प्रत- सर्व विभागीय आयुक्त.
सर्व उप आयुक्त (पुनर्वसन)
सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय (५ प्रती)
पुनर्वसन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय.
र-१ कार्यासन, निवड नस्ती.

RST
31/12008

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - RST
आवक नं. - २३५४८-४
14 JUN 2004
विशेष नोंद वही नं. -